C:\Users\ADMIN\Desktop\Covid-19 Circular.docx

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- 411018, लेखा विभाग
क्र.लेखा/6/कावि/३०६ /2020
दि.29/05/2020

**विषय- कोविड-19 च्या संसर्गजन्य रोगामुळे सन 2020-21 या वित्तीय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबत-**

संदर्भ- 1) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अर्थसं-2020/प्र.क्र.65/अर्थ-3 दि.04/05/2020
2) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-2020/प्र.क्र.72/ न.वि.16 दि.8/05/2020
3) लेखा विभागाकडील परिपत्रक क्र.लेखा/1/कावि/348/2020 दि.11/05/2020

**परिपत्रक**

मार्च 2020 पासून महाराष्ट्रात कोविड-19 च्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले असून कोरोनाग्रस्त बाधित रुणांच्या संख्येत वाढ होत आहे. यामुळे या महामारीवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून संपूर्ण देशात दि.24/03/2020 पासून लॉकडाऊन जाहीर करण्यात आला आहे. लॉकडाऊनद्वारे अनेक निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर संसर्गाचा प्रादूर्भाव अद्यापही वाढत असल्याने व त्यामुळे लागू केलेल्या लॉकडाऊनद्वारे घातलेल्या अनेक निर्बंधाच्या अनुषंगाने राज्याची आर्थिक घडी पुढील 2-3 महिन्यातही अशीच रौंहण्याची शक्यता आहे. या वित्तीय स्थितीतून बाहेर पडून राज्याच्या अर्थव्यवस्थेला उभारी आणण्याचे राज्यासमोर मोठे आव्हान आहे.

शासन निर्णय क्र.अर्थसं2020/प्र.क्र.65/अर्थ-3 दि.4/5/2020 अन्वये वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचा परिणाम महानगरपालिकेस शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान, सहाय्यक अनुदान व इतर विविध योजनांचा शासनहिस्सा यावर होऊ शकतो. तसेच राज्य शासनाकडून माहे एप्रिल व मे-2020 या महिन्यांकरीता अपेक्षित असलेले स्थानिक संस्था कर अनुदान व 1% मुद्रांक शुल्क अनुदान अद्यापपर्यंत पूर्णपणे प्राप्त झालेले नाही. तसेच सद्यस्थितीतील घडामोडींचा महानगरपालिकेच्या नगररचना विकास शुल्क सारखे उत्पन्न, मालमत्ता कर व इतर उत्पन्नावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच महानगरपालिकेचे न टाळता येणारा खर्च जसे कि वेतन व भत्ते व इतर बांधील खर्च व कोव्हीड-19 संदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरीता निधी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भिय क्र.3 चे परिपत्रकान्वये सर्व विभाग प्रमुखांना दिनांक 8/5/2020 च्या शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने पुढील उपाय योजना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

1) सर्व विभागांनी त्यांच्याकडील योजना व प्रस्तावित कामे यांचा पुनर्विचार करुन प्राधान्यक्रम ठरवावा.

2) सर्व विभागांनी प्रथमतः 2020-2021 अर्थसंकल्पीय निधीच्या फक्त 33% निधी उपलब्ध होईल या सूत्राच्या अधिन राहून नियोजन करावे.

3) सर्व विभागांनी सन 2020-21 मधील अर्थसंकल्पीय तरतूदीचा आढावा घेवून ज्या योजना पुढे ढकलण्यासारख्या आहेत किंवा रद्द करण्यासारख्या आहेत त्या निश्चित कराव्यात व त्याचा आढावा घेऊन विद्यमान खर्चामध्ये बचत करण्याच्यादृष्टीने प्राधान्याने उपाय योजना कराव्यात.

4) स्थायी / अस्थायी / बाह्य यंत्रणेद्वारे केलेला मनुष्यबळाचा वापर करीताची बिले, पाणी बिले, लाईट बिले, शासकीय कर इ. तरतूदीच्या खर्चास बंधन राहणार नाही. तथापि विभागास या व्यतिरिक्त उपलब्ध करुन दिलेल्या सर्व तरतूदीपैकी केवळ 33% तरतूदीच्या अधिन खर्च करता येईल.

5) कोणत्याही विभागास कोणत्याही प्रकारचा खर्च मा.आयुक्त सो यांच्या पूर्व अनुमती शिवाय उणे प्राधिकारावर करता येणार नाही.

6) कोरोना व्हायरसमुळे उद्भवलेली परिस्थिती हाताळण्यासाठी वैद्यकीय विभाग, वाय.सी.एम.एच. विभाग, आरोग्य विभाग, रुग्णवाहिका विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग यांचे प्रथम प्राधान्य निश्चित करण्यात येत आहे. या विभागांनी कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी व कार्यालयीन बाबींसाठी (Operational expenses) तरतूदी खर्च कराव्यात.

7) प्राधान्यक्रम असलेले विभाग सोडून इतर कोणत्याही विभागाने, कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मंजूरी देऊ नये. तसेच विद्यमान फर्निचरची दुरुस्ती, झेरॉक्स मशीन, संगणक खरेदी, उपकरणे, नैमित्तिक कार्यशाळा, सेमिनार व भाड्याने कार्यालय घेणे इ. बाबींवरील खर्चांवर सध्या प्रतिबंध आणण्यात येत आहेत.

8) सर्व विभागांनी पुढील आदेशापर्यंत कोणतीही बांधकाम हाती घेऊ नये (तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, निविदा, कार्यारंभ आदेश देऊ नयेत). ज्या अधिका-यांना तांत्रिक मान्यता देण्याचे प्राधिकार आहेत त्यांना निर्देशित करण्यात येते की, चालू वित्तीय वर्षात कोणत्याही तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येऊ नयेत. मात्र कार्यारंभ आदेश दिलेली व सुरु असलेली कामे चालू राहतील. तसेच विभागांनी फक्त मान्सूची पूर्वतयारी करण्याच्या अनुषंगाने काम करण्यात यावीत.

9) सन 2020-21 या आर्थिक वर्षात कार्यालयाच्या दैनंदिन वापरातील उपभोग्य वस्तुंच्या मर्यादित खरेदी/वापराकरिता 75 % च्या प्रमाणात / मर्यादेत अनुमती राहील.

उपरोक्त उपाययोजनांचे पुढील आदेश होईपर्यंत सर्व विभागांनी पालन करावे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- 411018

प्रति,

सर्व विभागप्रमुख / शाखाधिकारी
सदर परिपत्रकाची काटेकोरपणे नोंद घ्यावी.